









# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

## दापोली ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा



# बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम

# माहिती पुस्तिका

सन २०२४-२५

**महामहीम श्री. रमेश बैस**
**राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व कुलपती**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**मा.ना. श्री. धनंजय मुंडे**
**कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य, अध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण**
**व संशोधन परिषद आणि प्रति कुलपती**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**डॉ.संजय भावे**
**कुलगुरू,**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**ई- मेल-vcdbskkv-mh@gov.in**

**डॉ. प्रशांत शंकर बोडके**
**शिक्षण संचालक,**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**ई-मेल- deandapoli@gmail.com**

**डॉ. प्रशांत शंकर बोडके**
**सहयोगी अधिष्ठाता,**
**निम्नस्तर कृषि शिक्षण,**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**ई-मेल- adlaedbskkv@rediffmail.com**

**डॉ. प्रदीप हळदवणेकर**
**कुलसचिव,**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**ई-मेल- regr.dbskkv@gov.in**

**श्री. सुनिलकुमार पंडीत दुसाने,**
**उपकुलसचिव,**
**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**ई-मेल- generalbranch2014@gmail.com**

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या सन १९७२ च्या १८ व्या कायद्यानुसार महाराष्ट्र अधिनियम एक्स्.एल्.आय. १९८३ हा सुधारीत विद्यापीठ कायद्यानुसार स्थापन झालेल्या दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांत आहे.

या विद्यापीठात उच्चस्तर पदवी शिक्षण कार्यक्रमांतर्गत कृषि, वनिकी, कृषि अभियांत्रिकी आणि मत्स्य विज्ञान या विद्याशाखा आहेत. त्याचबरोबर निम्नस्तर कृषि विद्याशाखेंतर्गत विविध पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जातात. निम्नस्तर विद्या शाखेतील कृषि पदविका अभ्यासक्रमामध्ये २००० साली बदल करण्यात आला. सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळास अनुरुप अभ्यासक्रम राबविण्यातच्या सूचना राज्य शासनाकडून प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथे सांगोपान चर्चा झाली. कृषि परिषदेच्या दिनांक ३० जून २००७ रोजी झालेल्या बैठकीतील ७२ व्या ठरावान्वये दोन वर्षे कालावधीचा कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम बदलण्यात आला. त्याप्रमाणे माळी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे नामकरण 'बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र' अभ्यासक्रम असे करण्यात आले. सदर सुधारित अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिकांना प्राधान्य देण्यात आले आहे. कारण महाराष्ट्र राज्याच्या विशेषत: कोकणच्या उद्यान क्षेत्राच्या गरजा लक्षात घेवून उद्यान पूरक व्यवसायातील प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे गरजेचे आहे.

सुधारित बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविणाऱ्या विद्यापीठाची केंद्रे व प्रवेश प्रक्रिया इ. तपशील या माहिती पुस्तिकामध्ये देण्यात आला आहे.

# बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## (मराठी माध्यम असलेले अभ्यासक्रम)

| अ. क्र. | संस्था | अभ्यासक्रम कालावधी | शैक्षणिक पात्रता | प्रवेश क्षमता | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली, जि.रत्नागिरी (घटक) भ्रमणध्वनी क्र. ९४२३२९६००० | १ वर्ष | ९ वी उत्तीर्ण | ३० + १० | रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी १० जागा पाणलोट क्षेत्रातील उमेदवार यांचेकरिता राखीव आहेत. |
| २) | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर (घटक) दूरध्वनी क्र. (०२५२५) २४१०४८ | | | २५ | ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांसाठी |
| ३) | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग. दूरध्वनी क्र. (०२३६६) २६२२३४ | | | ४० | सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी |

टिप - संबंधित जिल्हयातील उमेदवार नसल्यास विद्यापीठ कार्यक्षेत्रातील व इतर जिल्ह्यांतील उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

## प्रवेश :

१) संबंधित अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतेवेळी उमेदवाराचे वय १४ ते ४५ वर्षे असावे.

२) संबंधित अभ्यासक्रमाकरिता गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

३) अर्हताधारक उमेदवारांनी त्यांचे विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली/ कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर/सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले यांचे कार्यालयात पोहोच घेवून सादर करावा.

४) पूर्णपणे भरलेले आणि विहित मुदतीत प्राप्त झालेले अर्ज प्रवेशाकरिता विचारात घेतले जातील.

५) टपालखात्याच्या विलंबाबद्दल विद्यापीठ/संस्था जबाबदार राहणार नाही.

६) प्रवेश अर्जाच्या बाबतीत खालीलपैकी एक अगर अधिक त्रुटी असल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

क) प्रवेश अर्जावर उमेदवाराची स्वाक्षरी नसेल.

ख) प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या परीक्षेचे गुणपत्रक/श्रेणीपत्रक यांच्या साक्षांकीत/सत्य/छायांकित प्रती जोडल्या नसल्यास.

ग) प्रवेश अर्ज विहित मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास.

घ) प्रवेश अर्ज अपूर्ण असल्यास तसेच प्रवेश अर्ज शुल्क न भरल्यास.

च) एखाद्या विद्यार्थ्याने अन्य ठिकाणी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल, तर अशा विद्यार्थ्याने संबंधित संस्थेचे अधिकृत विद्यार्थी असल्याचे प्रमाणपत्र (बोनाफाईड सर्टिफिकेट) सादर करावे. मात्र प्रवेश घेतेवेळी मूळ शाळा सोडल्याचा दाखला सादर करावा लागेल.

छ) प्रवेशाकरिता शाळा सोडल्याचा डुप्लिकेट दाखला स्वीकारला जाणार नाही. असे प्रवेश अर्ज रद्द करण्यात येतील. तथापि, एखाद्या उमेदवाराचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला हरवला असल्यास, अशा उमेदवाराने प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा डुप्लिकेट दाखला व सोबत रूपये १००/- च्या मुद्रांकावर तहसिलदार यांच्या समोर केलेले शपथपत्र सादर करावे.

ज) प्रवेश अर्जासोबत ७/१२ चा उतारा, शाळा सोडल्याचा दाखला, इ. ९ वी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक नसेल.

झ) ज्या उमेदवाराचे आई/वडील/आजी/आजोबा यांच्या नावे शेतजमीन नाही, अशा अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती/भटक्या जमातींच्या उमेदवारांनी संबंधित जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडलेले नसेल.

७) प्रवेश घेण्यासाठी उमेदवाराने स्वतः हजर राहिले पाहिजे. प्रवेश घेण्यासाठी हजर राहताना उमेदवाराने प्रवेश शुल्काची पूर्ण रक्कम व अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती घेऊन हजर रहावयाचे आहे. जर उमेदवार प्रवेशासाठी स्वतः हजर नसेल, तर त्या उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही. एखादा उमेदवार अपवादात्मक परिस्थितीत वैद्यकीय कारणास्तव हजर राहू शकत नसेल, तर अशा उमेदवाराने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८) प्रवेश घेतल्यानंतर प्रवेशासाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांमध्ये प्रवेशासाठी उपयुक्त ठरेल अशा प्रकारचा फेरबदल केलेला आढळून आल्यास सदर उमेदवाराला देण्यात आलेला प्रवेश विद्यापीठ कोणत्याही वेळी रद्द करील.

९) विद्यार्थ्यांनी माहितीपत्रकातील प्रवेश कार्यक्रम आणि शैक्षणिक दिनदर्शिका स्वतःच्या हितार्थ व माहितीसाठी पहाव्या.

१०) संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत उमेदवारांची गुणवत्ता सूची त्या त्या संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

## ११) प्रवेश पध्दत :

अ)प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावरील Admission या टॅब वर क्लिक करुन '**बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२४-२५** ' या फाईल मधून माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज डाऊनलाड करुन A4 पेपरवर प्रिंट काढून स्वतःच्या हस्ताक्षरात भरावा.

ब) प्रवेशासाठी विहित नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहिती पत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

क) उमेदवारांनी अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत सत्यप्रती/छायांकित प्रती जोडाव्यात.

१. संबंधित अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आणि गुणपत्रक.

२. शाळेचा/महाविद्यालयाचा संस्था सोडल्याचा दाखला किंवा अन्यत्र प्रवेश घेतला असल्यास अधिकृत प्रमाणपत्र. (बोनाफाईड सर्टिफिकेट)

३. जातीचा दाखला महसूल खात्याच्या योग्य त्या नमुन्यामध्ये सक्षम अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी असावा.

४. अर्जदाराच्या आई-वडिलांची जमीन कृषि विद्यापीठ /पाटबंधारे /विद्युत /संरक्षण इत्यादी शासकीय प्रकल्पासाठी संपादित केली गेली असल्यास आणि ते प्रकल्प विस्थापित झाले असल्यास महसूल खात्याच्या निर्धारित नमुन्यात पुनर्वसन अधिका-याचे सही शिक्क्यानिशीचे प्रकल्प विस्थापित असल्याचे प्रमाणपत्र.

ड) प्रवेश अर्जासोबत प्रवेश अर्ज शुल्क - खुला प्रवर्ग रु. ५०/- व आरक्षित प्रवर्ग रु.२५/- मात्र भरावयाचे आहेत. सदरचे शुल्क ना परतावा आहे.

**१२) स्वातंत्र्य सैनिक असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या सहीचे प्रमाणपत्र** - एखाद्या स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाला/मुलीला या सवलतीचा फायदा घ्यावयाचा असल्य स्वातंत्र्य सैनिक हयात असल्यास स्वातंत्र्य सैनिकाने, हयात नसल्यास त्याचे मुलाने अथवा, स्वातंत्र्य सैनिकाचे पत्नीने शंभर रुपयांच्या मुद्रांकित कागदावर खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

अ) अर्जदार हा/ही स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा मुलगा/मुलगी आहे.

ब) सदर स्वातंत्र्य सैनिकाने आपल्या कोणत्याही नातेवाईकांसाठी यापूर्वी फायदा घेतलेला नाही.

क) जर यावेळी सदर सवलतीचा फायदा मिळाला तर संबंधित स्वातंत्र्य सैनिक यापुढे आपल्या कोणत्याही नातेवाईकासाठी या सवलतीचा उपयोग करणार नाही.

१३) माजी सैनिक असल्याबद्दलचे जिल्हा सैनिक बोर्डाचे अथवा सैन्यातील सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.

१४)उमेदवाराचे आई/वडील कृषि विद्यापीठ संलग्न/मान्यता प्राप्त संस्थेचे कर्मचारी असल्यास, कृषि विद्यापीठ संबंधीत संस्थेतील सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.

१५)सक्षम अधिका-याचे अधिवासिता प्रमाणपत्र.

## १६)आरक्षित जागा :

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठांतर्गत संस्थेमध्ये प्रवेशासाठी खालीलप्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | वर्ग | आरक्षित जागांची टक्केवारी | |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती व नवबौध्द (एससी.) | १३ | |
| २) | अनुसूचित जमाती (एस.्.टी.) | ७ | |
| ३) | अ. विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) (व्ही.जे.- अे)<br>ब. भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी.- बी)<br>क. भटक्या जमाती (धनगर व तत्सम जाती) (एन.टी.- सी) ड. भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) (एन.टी.- डी) | ३<br>२.५<br><br>३.५<br>२ | नॉनक्रिमीलेअर तत्त्व लागू आहे. |
| ४) | इतर मागासवर्ग | १९ | |
| ५) | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी) | - | |
| ६) | आर्थिक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) | १० | |
| | **एकूण** | ६० | |
| ७) | **स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य (एफ.एफ.)** | २ | |
| ८) | आजी व माजी सैनिकांची मुले | २ | |
| ९) | दिव्यांग (४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) (पी.एच.) | ५ | |
| १०) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पपिडित | ४ | |
| ११) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा अनुभव असलेली शेतक-यांची मुले | ६ | |
| १२) | महिला | ३० | |
| १३) | अनाथ | १ | |
| | **एकूण** | ५० | |

शासन निर्णय क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र. १५/मावक ५, दिनांक ५.६.२००६ अन्वये विमुक्त जाती अ भटक्या जमाती ब, क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय, विशेष मागास वर्ग आणि सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) यांनी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांचे सही शिक्यानिशी क्रिमिलेअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेच तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयामध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात येईल.

२. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहील्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. (नॉन क्रिमीलेअर दाखला आवश्यक)

३. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश क्षमतेच्या कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहील्या तर त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात येतील. जसे अ.जा./अ.ज./वि.जा./भ.ज. आणि इतर मागासवर्गीय तथापि या पध्दतीनेही आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

## १७) अभ्यासक्रम अध्यापन आणि मुल्यमापन:

१.प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे निर्धारित केलेल्या नियमानुसार वार्षिक परिक्षा पध्दतीने मुल्यमापन करण्यात येईल.

२.अभ्यासक्रमाची चाचणी, सहामाही इत्यादी परिक्षा या संबंधित संस्थामार्फत घेतल्या जातील. सहामाही परिक्षा जानेवारीमध्ये आणि वार्षिक परिक्षा जुलैमध्ये घेतल्या जातील.

३. लेखी परीक्षेत ३५ टक्के आणि प्रात्यक्षिक परिक्षेत ३५ टक्केपेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी अनुत्तीर्ण म्हणून जाहीर करण्यात येईल.

४. ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या विद्यार्थ्यास प्राविण्यासह प्रथम श्रेणी दिली जाईल.

५. एकूण ६० टक्के आणि त्या पेक्षा अधिक आणि ७५ टक्के पेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला म्हणून जाहीर करण्यात येईल.

६. ४५ टक्के आणि त्या पेक्षा अधिक आणि ६० टक्केपेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उर्त्तीर्ण झाला असे मानण्यात येईल.

७.४५ टक्केपेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाला असे समजण्यात येईल.

८. जर एखादा विद्यार्थी लेखी अथवा प्रात्यक्षिक अथवा एक लेखी व एक प्रात्यक्षिक परीक्षेत ५ गुणांनी अनुत्तीर्ण होत असेल तर त्याला जास्तीत जास्त ५ गुण वाढवून देण्यात येतील व त्याला उत्तीर्ण घोषित करण्यात येऊन श्रेणी देण्यात येईल.

## १८) प्रमाणपत्र :

१) विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले प्रमाणपत्र विद्यापीठाच्या शिक्षण संचालक, यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाद्वारे प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला देण्यात येईल. या करिता विद्यार्थ्यास रुपये १५/- इतके शुल्क विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

## १९) परीक्षा शुल्क, परीक्षेचा अर्ज, प्रवेश कार्ड इत्यादी :

अ) अंतिम परिक्षेला बसू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नमुन्यामध्ये परिक्षेला बसण्यासाठी अर्ज करावा लागेल.

ब) विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेले परिक्षा शुल्क आणि गुणपत्रक शुल्क हे संबंधित संस्थाच्या प्राचार्यांकडे भरावे लागेल आणि प्राचार्य अर्जाची संपूर्ण छाननी करुन ते अर्ज, तथापि शुल्क मात्र, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नांवे करुन, विद्यापीठाच्या कुलसचिवांकडे पाठवतील.

क) कुलसचिवांच्या अधिपत्याखालील निम्नस्तर कृषि शिक्षण परीक्षा विभाग आलेल्या सर्व अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थांना परीक्षा क्रमांकाचे प्रवेशपत्र देईल.

ड) विद्यापरिषदेने संमत केलेल्या परीक्षा कार्यक्रमानुसार कुलसचिव या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षा प्रतिवर्षी जुलैमध्ये आयोजित करतील.

## २०) वैद्यकीय प्रमाणपत्र :

या अभ्यासक्रमासाठी निवडलेला विद्यार्थी आरोग्यदृष्टया सुदृढ आणि सक्षम असला पाहिजे. याकरिता त्याने प्रवेश घेतेवेळी शासकीय मान्यताप्राप्त सक्षम आरोग्य अधिका-याचे प्रमाणपत्र सही शिक्क्यानिशी सादर करावे.

## २१) उपस्थिती :

अंतिम परीक्षेला बसू इच्छिणा-या विद्यार्थ्यांची एकूण ८० टक्के पेक्षा कमी उपस्थिती असून चालणार नाही तथापि, अपवादात्मक परिस्थितीत वैद्यकीय अथवा तत्सम कारणास्तव प्रभारी अधिकारी उपस्थितीत ५ टक्के सवलत देतील. या करिता संबंधीत केंद्राचे अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या दाखल्यांसह अर्ज सादर करावा.

## २२) पुन:परीक्षा :

वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यास पुढीलवर्षी होणा-या संबंधित वर्षाच्या परीक्षेत बसण्याची सवलत संबंधित संस्थेचे प्रमुख अर्जासहित चालू शैक्षणिक वर्षा मधील माहिती पुस्तिकेत नमुद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क व गुणपत्रक शुल्क घेऊन देतील.

## २३) विद्यार्थ्यांची जबाबदारी :

प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्वसामान्य बाबींची पूर्णपणे माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांनी या बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील असणे अपेक्षित आहे. त्यांनी केंद्राशी सतत संपर्क साधून असले पाहिजे. केवळ नियमाविषयी अज्ञान हे त्या नियमाच्या अस्वीकृतीला कारण होऊ शकणार नाही.

## २४) शैक्षणिक सहली :

निर्धारीत केलेल्या शैक्षणिक सहलीचे आयोजन अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

## २५) वसतिगृह निवास :

सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मर्यादित प्रमाणात विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निवास व्यवस्था उपलब्ध आहे. प्रवेश देण्यात आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास संबंधित शिक्षण संस्थेच्या वसतिगृहामध्ये निवासाची सोय उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

## २६) अनुचित गैरशिस्त वर्तन :

विद्यापीठामध्ये प्रचलित असलेल्या विनियम व परिनियमातील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांच्या गैरवर्तुणुकीबाबत अथवा गैरशिस्तीबाबत कार्यवाही केली जाईल.

## २७) शैक्षणिक शुल्क :

| अ. क्र. | शुल्काचा तपशील | केंद्रांची फी आकारणी |
|---|---|---|
| | | अनुदानित |
| १. | अध्यापन शुल्क | २५० |
| २. | सुरक्षा अनामत परत केली जाईल | १०० |
| ३. | वर्ग परिक्षा शुल्क | - |
| ४. | जिमखाना शुल्क (प्रती वर्ष) | ५० |
| ५. | • वार्षिक परिक्षा शुल्क | ३०० |
| ६. | • नोंदणीशुल्क (प्रती वर्ष) | ५० |
| ७. | ओळखपत्र | २० |
| ८. | स्नेहसंमेलन (प्रती वर्ष) | २५ |
| ९. | • गुणपत्रक शुल्क | १० |
| १०. | • प्रमाणपत्र शुल्क | १५ |
| ११. | • प्रवेश शुल्क | २५ |
| १२. | ग्रंथालय शुल्क (प्रतीवर्ष) | ५० |
| १३. | वैद्यकीय | १० |
| १४. | विद्यार्थी सुरक्षा वर्गणी | ६ |
| १५. | विद्यार्थी कल्याण निधी | ५० |
| | एकूण | ९६१/- |
| १६. | ** वसतिगृह भाडे देखभाल (प्रती वर्ष) | ४०० |
| १७. | ** भोजनगृह आगावू रक्कम नोंदणीच्यावेळी (परत केली जाईल) | ३०० |
| | एकूण | १,६६१/- |

- विद्यापीठाला भरणा करणे आहे.

** सुविधा उपलब्ध असल्यास.

## २८) प्रवेश प्रक्रिया :

प्रवेश अर्ज दाखल केलेल्या, तसेच प्रवेश इच्छुक उमेदवारांनी संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर तसेच विद्यापीठ कार्यालयाच्या सूचना फलकावर जाहीर केलेल्या सूचीतील आपले नाव पाहून, नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. प्रवेश इच्छुक उमेदवारांनी त्यांचा गुणवत्ता क्रमांक संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता सूचीमध्ये स्वहितार्थ स्वतः येवून पहावयाचा आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा कार्यालयीन पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

## प्रवेश कार्यक्रम २०२४-२५

| अ.क्र. | तपशील | बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १) | माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ व संबंधित केंद्रांत प्रसिध्द करावयाचा दिनांक | २४/०५/२०२४ |
| २) | संपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | २९/०६/२०२४ |
| ३) | प्रवेशाकरिता तात्पुरती निवड झालेल्या आणि प्रतिक्षा सूचीवरील उमेदवारांची सूची वार्ताफलकावर जाहिर करणे. | ०६/०७/२०२४ |
| ४) | अ) नाव नोंदणी (निवड सूचीनुसार)<br>ब) प्रतिक्षा सूचीवरील उमेदवारांची नाव नोंदणी<br>क) रिक्त जागा भरण्याची अंतिम मुदत<br>ड) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाला नोंदणी अर्जासह सादर करणे. | १६/०७/२०२४<br>२४/०७/२०२४<br>०८/०८/२०२४<br>१०/०८/२०२४ |

# शैक्षणिक दिनदर्शिका २०२४-२५

| | | |
|---|---|---|
| १) | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १३/०८/२०२४ |
| २) | दिवाळी सुट्टी | २८/१०/२०२४ ते ०५/११/२०२४ |
| ३) | सहामाही परीक्षा | डिसेंबर, २०२४ |
| ४) | शैक्षणिक सहली/ कि डा स्पर्धा | जानेवारी / फेब्रुवारी, २०२५ |
| ५) | वार्षिक परीक्षा प्रात्यक्षिक व लेखी | मार्च / एप्रिल, २०२५ |
| ६) | निकाल जाहीर करणे | मे, २०२५ |

बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी, कृषि संशोधन केंद, पालघर, जि. पालघर आणि प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेगुर्ले येथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज खाली नमूद केलेल्या केंद्रांकडेच सादर करावेत.

## बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम

१)सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी - ४१५७१२

२)प्रभारी अधिकारी, बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, कृषि संशोधन केंद्र, मु. पो. पालघर, जि. पालघर - ४०१४०४

१.सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.

बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, दापोली, पालघर आणि वेंगुर्ले या ठिकाणी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या नावाची सूची संबंधित संस्थेच्या वार्ताफलकावर दिनांक ----------रोजी उपस्थित राहून पहावी. संबंधिताकडे संपर्क साधून माहिती पुस्तिका पृ.क्र. ०९ नुसार विहित शुल्क भरुन प्रवेश घ्यावा.

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली, जि. रत्नागिरी.

उमेदवाराचा फोटो

**बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरीता प्रवेश अर्ज २०२४-२५**

सूचना:- अ) माहितीपुस्तिकेचे काळजीपूर्वक वाचन करुन एका उमेदवाराने एकच अर्ज भरावा.
ब) अपूर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

प्रति,
प्रभारी अधिकारी,
बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, ______________ अर्ज क्रमांक

१) उमेदवाराचे नाव:-श्री./कु. ______________
(आडनांव) (स्वत:चे नाव) (वडील/पतीचे नाव) (आईचे नाव )

२) कायम वास्तव्याचा पूर्ण पत्ता : ______________

३) पत्र व्यवहाराचा पत्ता : ______________

४) संपर्क दूरध्वनी क्रमांक : ______________

५) उमेदवाराच्या वडील/पतीचे पूर्ण नाव : ______________

६) वडीलांचा/पालकांचा व्यवसाय : ______________

७) उमेदवाराच्या आईचे माहेरचे पूर्ण नाव : ______________

८) ७/१२ उताऱ्यावरील पत्ता : मु.________ पो. ________ ता.________ जि. ________

९) जन्म तारीख : / / (शाळा सोडल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे)

१०) जात : ______________ ११) वर्गवारी ______________

१२) विवाहीत/अविवाहीत : ________ १३) लिंग (पु./स्त्री) : ________

१४) इतर दुसऱ्या परीक्षा उत्तीर्ण आहात काय? ______________
(इयत्ता १०वी, १२ वी परीक्षेचे उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक साक्षांकित करून जोडावे.)

**प्रतिज्ञापत्र**

आम्ही (उमेदवाराचे नाव)______________ व ______________
(पालक)रा. ______________ ता. ______________ जि. ______________

असे लिहून देतो की, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या कार्यक्षेत्राखालील बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेशास आमची पूर्ण संमती असून प्रवेश मिळाल्यास प्रवेशानंतर विद्यापीठाचे तसेच विद्यालय/संस्थेचे नियम, अटी/शर्ती आम्हांवर बंधनकारक असतील व त्यांच्या पालनासंबंधी अपेक्षित पूर्ण जबाबदारी आमची असेल.

ठिकाण :
दिनांक : पालकाची सही उमेदवाराची सही

# अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे (छायांकित प्रती या क्रमाने सोबत जोडावीत)

१) इयत्ता ९ वी (उत्तीर्ण), १०वी, १२वी गुणपत्रक (उत्तीर्ण व अनुत्तीर्ण सर्व)

२) शाळा सोडल्याचा दाखला

३) ७/१२ चा उतारा २०२२-२३ किंवा २०२३-२४

४) शेतमजूर असल्याबाबत तहसिलदार यांचा दाखला

५) मागासलेल्या जाती/जमाती अथवा इतर मागासवर्गीय असल्यास त्यांना संबंधीत तहसिलदार किंवा वरिष्ठ सक्षम अधिकाऱ्यांने दिलेले विहीत नमुन्यातील जातीचे प्रमाणपत्र.

६) वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) व इ.मा.व. आणि वि.मा.प्र. या संवर्गातील उमेदवारांनी उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेले ‘नॉन क्रिमीलेअर’ बाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) जिल्हा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतल्याबद्दलचा जिल्हा क्रिडा अधिकारी/जि.प. शिक्षणाधिकारी यांचा दाखला

८) एन.सी.सी./स्काऊट बद्दलचे प्रमाणपत्र.

९) स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेली आरक्षण सवलत पाहिजे असल्यास उमेदवारांचे आई/वडील स्वातंत्र्य सैनिक असल्याबद्दलचे मा. मुख्यमंत्र्यांचे सहीचे पत्र. उमेदवाराचे आजोबा/आजी स्वातंत्र्य सैनिक असल्यास उमेदवाराने, स्वातंत्र्य सैनिकाने खालील मुद्यांबाबत रूपये १००/- चे मुद्रांकीत कागदावर (स्टॅम्प पेपरवर) दिलेले प्रतिज्ञापत्र जोडावे.

अ) उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा मुलगा/मुलगी आहे.

ब) स्वातंत्र्य सैनिकाने या सवलतीचा उपयोग यापुर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.

क) जर यावेळी सदर सवलतीचा फायदा मिळाला तर संबंधित स्वातंत्र्य सैनिक यापुढे आपल्या कोणत्याही नातेवाईकासाठी या सवलतीचा उपयोग करणार नाही.

१०) विद्यापीठ किंवा इतर प्रकल्प विस्थापितांनी मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी(मा. डिस्ट्रीक्ट रिसेटलमेंट /रीहॅबीलिटेशन ऑफीसर) यांचा दाखला जोडावा.

११) वैद्यकीय प्रमाणपत्र

<u>टिप</u>:- वरील अनुक्रमांक १ ते ११ येथील जे कागदपत्र जोडले असतील त्याच क्रमांकावर दिलेल्या चौकानात √ अशी खूण करावी. जोडलेल्या कागदपत्रांची एकूण संख्या.

**दिनांक :** **उमेदवाराची सही**

**२८)  प्रवेश प्रक्रिया :**

**प्रवेश अर्ज दाखल केलेल्या, तसेच प्रवेश इच्छुक उमेदवारांनी संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर तसेच विद्यापीठ कार्यालयाच्या सूचना फलकावर जाहीर केलेल्या सूचीतील आपले नाव पाहून, नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. प्रवेश इच्छुक उमेदवारांनी त्यांचा गुणवत्ता क्रमांक संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता सूचीमध्ये स्वहितार्थ स्वतः येवून पहावयाचा आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा कार्यालयीन पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**